दैनिक साहसिक

शुक्रवार
२७ जुलै
२०१८

संमिश्र

## पान १ वरुन...

**वर्धा जिल्ह्यातील तत्कालीन पोलिस अधिक्षक अंकित गोयल, डीवायएसपी माधव पडीले, पुलगाव ठाणेदार मुरलीधर बुरांडे यांना मा.उच्च न्यायालय नागपूर खंडपीठांनी काढले कारणे दाखवा नोटीस !**

डीवायएसपी माधव पडीले, तत्कालीन वर्धा शहर ठाणेदार मुरलीधर बुरांडे विरोधात भादंविचे कलम १९१, १९२, १९३, १९९, २००, ४६५, ४६६, ४६७, ४७१, ४७४, व १२० (ब) सामुहिक कट रचने असे गुन्हे दाखल तुमच्यावर का करण्यात येवू नये. तसेच तिनही आरोपी यांनी रविंद्र कोटंबकार यांची मानहानी केली व त्यांना हेतूपुरस्पर मानसिक त्रास दिला. यामुळे कलम ३५७ फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणे १ कोटी रुपये नुकसान भरपाई रवींद्र एन. कोटंबकार यांना का देण्यात येवू नये. अशा प्रकारची विनंती मा. न्यायधिश नागपुर खंडपिठ यांना रवींद्र कोटंबकार यांचे वकील जेष्ट विधीतज्ञ ॲड. ओंकार कोकडे यांनी केली असता त्यांनी आरोपी अंकीत गोयल, माधव पडीले व मुरलीधर बुरांडे यांना ४ आठवड्यात उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले. यामुळे आरोपी अंकीत गोयल,आरोपी माधव पडीले,पोलिस उपविभागीय अधिकारी, काटोल विभाग, नाशिक, आरोपी मुरलीधर बुरांडे पोलिस निरिक्षक, पुलगाव यांची पंढरी घाबरली असुन आता काय करावे ? अशा विवंचनेत त्रिरत्न चिंतातुर झाले आहे.

**पश्चिम बंगालचं नाव 'बांगला' करण्यास विधानसभेची मंजुरी**

प्रस्ताव ठेवला होता, तो देखील केंद्रीय गृह मंत्रालयाने फेटाळला होता. अखेर राज्य सरकारने पश्चिम बंगालचं नाव 'बांगला' करण्याचा निर्णय घेतला. याबाबतचा आज (२६ जुलै) विधानसभेत सादर केलेला प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

## पान ८ वरुन...

**राज्यात सातव्या वेतन आयोगाला गणेशोत्सवाचा मुहूर्त**

वाढता दबाव लक्षात घेता राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे. दिवाळीपासून प्रत्यक्षात सातवा वेतन आयोग लागू होणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. म्हणजेच दिवाळीच्या महिन्यापासून प्रत्यक्ष वाढीव पगार हा कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. सातवा वेतन आयोग लागू करताना आधीच खडखडाट असलेल्या राज्य सरकारच्या तिजोरीवर सुमारे २१ हजार कोटींचा भार पडणार आहे.

**दिल्लीत तीन बहिणींचा भूकबळी, न्यायालयीन चौकशी होणार!**

तरीही त्यांना घरातच ठेवलं होतं. त्यांच्यावर उपचारही केले नाहीत. शिवाय त्यांना जेवण दिलं नाही,' असं आईने सांगितलं. तर मुलींचा वडील मंगल सिंह काही वर्षांपासून रिक्षा चालवत होते. मंगल सिंहचा मित्र नारायण यादवच्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी त्यांची रिक्षा चोरीला गेली होती, त्यामुळे घरमालकाने त्याला घराबाहेर काढलं. कारण रिक्षा घरमालकाचीच होती. यानंतर नारायण यादवने आपल्याच घरात मंगलसिंहच्या कुटुंबाला राहण्यास जागा दिली.
आपल्या कुटुंबाला नारायण यादवच्या घरी सोडून मंगल नव्या कामाच्या शोधात घराबाहेर पडला. मंगळवारी सकाळी नारायण यादव त्याच्या घरी गेला असता, तिन्ही मुली बेशाद्धावस्थेत सापडल्या आणि आई घरातच होती. नारायण यादव आणि शेर्जाय़ांना मुलींना लाल बहादूर शास्त्र रुग्णालयात नेलं, जिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. धमुलींना जेवण मिळत नाही हे आधी माहित असतं, तर नक्कीच त्यांना जेवण दिलं असतं. पण हे कुटुंब दोनच दिवसांपूर्वी इथे आला होतं, त्यामुळे त्यांच्याबाबत फारशी माहिती नव्हती,'असं शेजारी म्हणाले.

**सामाजिक संघटनांचा सरकारवर निशाणा**

या घटनेनंतर अनेक सामाजिक संघटना सरकारवर नाराज आहेत. 'बचपन बचाओ' आंदोलनाचे संचालक राकेश सेंगर म्हणाले की, 'ही अतिशय लाजिरवाणी घटना आहे. संसदेपासून काही किलोमीटर अंतरावर हे घडलं आहे. सरकारला लाज वाटायल हवी. प्रत्येक जिल्ह्यात बाल संरक्षण समिती असते, जी मुलांच्या शिक्षण, पोषण आणि त्यांच्या सुरक्षेवर लक्ष ठेवते, ती काय करत आहे?'

**न्यायालयीने चौकशीचे आदेश**

उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांनी तिन्ही मुलींच्या मृत्यूप्रकरणी न्यायालयीने चौकशीचे आदेश दिले आहेत. सोबतच या मुद्द्यावर राजकारणही सुरु झालं आहे.

## सख्या भावाने केला बलात्कार अन् कोर्टाने तिलाच दिली सहा महिन्यांची शिक्षा

*वृत्तसंस्था / २७ जुलै*

**इंडोनेशिया :** सख्या भावाने बलात्कार केल्यामुळे गरोदर झालेल्या अल्पवयीन मुलीलाच कोर्टाने शिक्षा सुनावल्याचा अजब प्रकार इंडोनेशियामध्ये घडला आहे. १५ वर्षीय मुलीने गरोदर राहिल्यानंतर सहा महिन्यांनी गर्भपात केल्याच्या गुन्ह्याअंतर्गत तिला सहा महिन्याच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.
सुमात्रामधील इंडोनेशियातील माऊरा बुलियन येथे हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. जिल्हा कोर्टाचे प्रवक्ते आणि या खटल्यातील न्यायाधिशांपैकी एक असणाऱ्या लिस्टयो आरीफ बुद्धीमन यांनी या प्रकरणाबद्दल सविस्तर महिती दिली. आरोपी असलेल्या १७ वर्षीय भावाने आपल्या १५ वर्षीय बहिणीवर मागील वर्षभराच्या कालावधीमध्ये आठ वेळा बलात्कार केला. या प्रकरणात त्याला कोर्टाने दोन वर्षे तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. तर गर्भपात केल्याप्रकरणी १५ वर्षीय पिडीत मुलीला सहा महिन्यांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. गर्भधारणेनंतर सहाव्या महिन्यात तिने गर्भपात केला. इंडोनेशियातील कायद्याप्रमाणे गर्भपात करणे हा गुन्हा असल्याने तिला या प्रकरणात दोषी ठरवण्यात आल्याचे बुद्धीमन यांनी सांगितले.
भावाने बहिणीवर बलात्कार केल्यानंतर ती गरोदर राहिल्याचे सहा महिन्यांनंतर लक्षात आले. त्यावेळी तिने गर्भपात केला. या संपूर्ण प्रकार शेजाऱ्यांना परिसरामधील मृतअवस्थेतील शिर नसलेले अर्भक सापडल्यानंतर उघडकीस आला.
शेजाऱ्यांनी लगेच पोलिसांना याबद्दल महिती दिली. तपासामध्ये या मुलीने गर्भपात करुन अर्भक फेकून दिल्याचे मान्य केले आणि घडलेला सर्व प्रकार पोलिसांना सांगितला. पोलिसांनी तिच्या भावालाही अटक केली आणि सध्या तिच्या आईची चौकशी केली जात आहे. गर्भपात करण्यात तिने काही मदत केली असल्याचे चौकशीत उघड झाल्यात तिच्यावरही गर्भपातविरोधी कायद्याअंतर्गत खटला चालवण्यात येईल. या प्रकरणामध्ये मुलीला झालेली शिक्षा चुकीची असल्याचे मत सामाजिक कार्यकर्त्या असर्णाय़ा मदीना रामावती यांनी व्यक्त केली आहे.

# शेतकऱ्यांनी कपाशीवरील गुलाबी बोंड अळी सर्वेक्षणासाठी

## कामगंध सापळ्यांचा ( फेरोमोन ट्रॅप) वापर करण्याचे आवाहन



*प्रतिनिधी / २६ जुलै*

**वाशिम :** शेंदरी बोंडअळी या पतंगवर्गीय किटकाची मादी एक विशिष्ट प्रकारचा गंध वातावरणामध्ये सोडते त्यामुळे नर कीटक मादीकडे आकर्षित होतात. या तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतामधील नर पंतग पकडण्यासाठी फेरोमोन सापळे लावून मोठ्या प्रमाणात नर पंतग पकडण्यात येतात. त्यामुळे पुढील प्रजनन रोखण्यात मदत होते. या कीडींच्या संख्येचा अंदाज येण्यासाठी फेरोमोन ट्रॅप अर्थात कामगंध सापळे महत्वाचे साधन आहे. फेरोमोन सापळ्यात सलग तीन दिवस प्रति दिन ८ ते १० नर आढळून आल्यास किटकनाशकांचा वापर करणे आवश्यक असते. जुलै मध्यानंतर कापसाचे पीक, पाते, फुले लागण्याच्या अवस्थेत गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव दिसून येतो.
गुलाबी अळीचे जीवन चक्र खंडित करण्यासाठी व प्रादुर्भाव तात्काळ लक्षात येण्यासाठी कामगंध सापळ्यांचा वापर प्रभावी ठरतो. या सापळ्यांचा वापर, कपाशी लागवडीपासून ४५ दिवसांनी केल्यास किडीची संख्या लक्षात येते व त्यानुसार योग्य किटकनाशकांचा योग्यवेळी व योग्य प्रमाणात वापर करुन ही कीड नियंत्रणात येऊ शकते. फेरोमोन सापळ्यांच्या अभावी सुरवातीच्या अवस्थेत किडीचा प्रादुर्भाव लक्षात न येण्याची शक्यता असते त्यामुळे किडीचा प्रादुर्भाव उशिरा लक्षात आल्यास किटकनाशके सुध्दा प्रभावी ठरत नाहीत.
मागील वर्षीच्या खरीप हंगामात कपाशी पिकावर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आले होते. मागील आडवड्यामध्ये यवतमाळ, अमरावती, व वर्धा या परिसरातील जिनींग मिलमध्ये लावलेल्या कामगंध सापळ्यांमध्ये गुलाबी बोंडअळीचे पंतग आढळले आहेत. या कीडीच्या अवस्था जसे अळी, कोश आणि पंतग कापसाच्या मिल मध्ये आढळून येतात. यामुळे ही कीड नियंत्रणात ठेवणे आवश्यक आहेत. जिनींग मिल परिसरात किमान ५ कामगंध सापळे जिनींग मिल मध्ये लावावेत. या सापळ्यामध्ये जमा होणाऱ्या पतंगांची संख्या दररोज मोजून अडकलेले पतंग नष्ठ करावेत.
कपाशी पिकामध्ये सर्वेक्षणासाठी एकरी दोन सापळे तर कपाशी जिनींग मिल परिसरात किमान पाच सापळे लावावेत. कापसाच्या पिकापेक्षा सापळा एक फुट उंचीवर राहील अशी काळजी घ्यावी. गुलाबी बोंड अळी साठी पेक्टीनो-ल्युरचा वापर करावा. ल्यूर कंपनीपरत्वे निर्देशित कालावधीनुसार २० अथवा ४५ दिवसांपर्यंत वापरता येते. या कालावधी नंतर ल्यूर बदलणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया नोव्हेंबर अखेरर्पंत राबवावी. आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास सुरुवातीला ५ टक्के निंबोळी अर्काचा वापर करावा. निंबोळी उपलब्ध नसल्यास अझोडिरेक्टिन ३०० पीपीएम (१०० मिली) किंवा अझोडिरेक्टिन १५०० पीपीएम (५० मिली ) किंवा अझोडिरेक्टिन ५०००० पीपीएम ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. यानंतरही प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीच्या पातळीवर आढळून आल्यास प्रढीलप्रमाणे किटकनाशकाचा वापर करावा. क्लोरापायरीफॉस ५० ईसी-२० मिली किंवा प्रोफेनोफॉस ५० ईसी २० मिली किंवा थायोडीकार्ब ७५ डब्लूपी-२० ग्रॅम या कीटकनाशकांची १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.
महाराष्ट्र राज्य कृषी उद्योग विकास महामंडळ यांचे तालुका स्तरावरील अधिकृत विक्रेते यांचेकडे हे कामगंध सापळे विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत या कामगंध सापळ्यांचा शेतकरी बांधवांनी प्रभावीपणे वार केल्यास त्यांच्या परिसरामध्ये गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव होण्याची बाब लक्षात येणार आहे. आणि त्यामुळे गुलाबी बोंड अळीचे व्यवस्थापन करणे सोपे होईल, असे कृषि विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

# फुलसांवगी शाळेला पाचव्या दिवशीही टाळे



*प्रतिनिधी / २६ जुलै*

**फुलसावंगी :** शिक्षकांच्या मागणीसाठी गेल्या पाच दिवसांपासून येथील केंद्रीय शाळेला टाळे लागले आहे. मात्र शिक्षण विभाग अद्याप उदासीन असल्याने आता २८ जुलै रोजी पालकांनी फुलसावंगी ते महागाव राज्य मार्गावरच शाळा भरविण्याचा पवित्रा घेतला आहे. येथील जिल्हा परिषद केंद्रीय मराठी शाळेत पहिली ते चौथीपर्यंत ३६५ विद्यार्थी शिक्षण घेतात. येथे शिक्षकांची १३ पदे मंजूर आहे. मात्र केवळ तीनच शिक्षक कार्यरत आहे. शिक्षकांच्या मागणीसाठी पालक व नागरिकांनी १२ जुलै रोजी शिक्षण विभाला निवेदन दिले. मात्र शिक्षक न मिळाल्याने २० जुलै रोजी शाळेला कुलूप ठोकले. पाच दिवस उलटून गेल्यानंतरही शिक्षण विभाग जागा न झाल्याने आता पालकांनी रस्त्यावरच शाळा भरविण्याचा इशारा दिला आहे.
२८ जुलै रोजी सकाळी १० वाजता फुलसावंगी ते महागाव या राज्य मार्गावर शाळा भरविण्याचा आक्रमक पवित्रा पालकांनी घेतला असून तसे निवेदन महागावचे तहसीलदार, गटविकास आधिकारी, ठाणेदार आदींना देण्यात आले. यावेळी अमर दळवे, अजय देशपांडे, योगेश बाजपेई, याकूब खान, शशिकांत नाईक, अनिल गवळी, रघू बाभळे यांच्यासह पालक व नागरिक उपस्थित होते.

अधिकारी, शिक्षण विभागाचे दुर्लक्ष

शिक्षकांची वारंवार मागणी करूनही अधिकारी आणि शिक्षण विभाग दुर्लक्ष करीत आहे. यामुळे पालक संतापले आहे. शाळेला कुलूप ठोकूनही प्रशासन दाद देत नसल्याने पालकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. आता चक्क राज्य मार्गावरच शाळा भरवून शासनाचा निषेध केला जाणार आहे.

# शनी मंदिर सरकारच्या ताब्यात, विधेयक मंजूर



*प्रतिनिधी / २६ जुलै*

**नागपूर :** अहमदनगर जिल्ह्यातील शनी शिंगणापूर मंदिर आता राज्य सरकारच्या ताब्यात आलं आहे. शनी मंदिराच्या चौथऱ्यावर आता महिलाही जाऊ शकतील. कारण राज्य सरकरने विधानसभेत त्याबाबतचं विधेयक मंजूर केलं. श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्त विधेयक २०१८ विधानसभेत काल रात्री १२.३० वाजता मंजूर करण्यात आलं. सध्याच्या सार्वजनिक न्यासाची पुनर्रचना करुन नवीन अधिनियमाद्वारे शनैश्वर देवस्थान राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली येणार आहे.
देवस्थानचे व्यवस्थापन अधिक व्यापक, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याबरोबरच भाविकांना उत्तम सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी हा स्वतंत्र कायदा असेल.
शनैश्वराच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या संख्येत दिवसेंदिवस लक्षणीय वाढ होत आहे, मात्र तेथे येणाऱ्या भाविकांसाठी कोणत्याही सोयी सुविधा नाहीत. या मंदिराच्या विश्वस्त मंडळाने अनेकवेळा मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केला असून, सध्याच्या विश्वस्त मंडळाच्या नियुक्तीवरूनही वाद निर्माण झाला होता. त्यामुळे सरकारने हे विधेयक आणले.

**शनी मंदिराचा वाद**

शनी शिंगणापूर मंदिराच्या चाथऱ्यावर महिलांना प्रवेश बंदी होती. मात्र २८ नोव्हेंबर २०१५ रोजी एका महिलेने चाथऱ्यावर जाऊन शनीवर अभिषेक केला होता. महिलेने ४०० वर्षांची परंपरा मोडित काढत शनिदेवाला अभिषेक केला. या घटनेनंतर ७ सुरक्षारक्षकांना निलंबित करण्यात आलं होतं.
महिला भक्ताने शनिदेवाच्या चाथऱ्यावर जाऊन त्याचं दर्शन घेत तेलाचा अभिषेक केल्याचं प्रकरण उघडकीस येताच शिंगणापूरसह राज्यभरात चांगलाच गदारोळ माजला. मात्र, तिने शनिदेवाचं दर्शन घेणं ही एका क्रांतीची नांदी असल्याचं सांगत सामाजिक स्तरातून कौतुकाचा वर्षाव झाला.
दुसरीकडे महिलेने थेट गार्भाय़ात जाऊन दर्शन घेतल्यामुळे ग्रामस्थांनी निषेध सभा घेतल्या. इतकंच नाही तर शनीच्या मूर्तीवर दुग्धाभिषेक करुन शुद्धी करण्याचाही घाट घातला होता.
मात्र ८ एप्रिल २०१६ रोजी शनी मंदिराच्या इतिहासात पहिल्यांदाच महिलांनी चाथऱ्यावर प्रवेश करुन शनीदेवाचं दर्शन घेतलं. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मंदिर समितीने महिलांना दर्शन खुलं केलं. त्यानंतर भूमाता रणरागिणी ब्रिगेडच्या कार्यकर्त्या पुष्पक केवडकर आणि प्रियांका जगताप यांनी थेट शनी चौथरा गाठला आणि शनीदेवाला पुष्पहार अर्पण करुन तेल वाहिलं.
दुसरीकडे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांनी महिलांना मंदिर प्रवेशासाठी न्यायालयीन लढा दिला होता. त्यावेळी १ एप्रिल २०१६ रोजी हायकोर्टाने मंदिरामध्ये महिलांना मिळणाऱ्या प्रवेशाचा मार्ग आता मोकळा करुन दिला होता. मुंबई उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत न्यायालयाने राज्य सरकारला आपल्या कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांच्या लढ्याला मोठं यश आलं होतं.
'कायद्याने महिलांना कुठेही प्रवेश बंदी केली जावू शकत नाही. असं असताना शनि शिंगणापूर येथे महिलांना प्रवेश कसा नाकारला जातो?' असा सवाल करत मुंबई उच्च न्यायालायने राज्य सरकारला चांगलच धारेवर धरलं होतं.

# गुरुपौर्णिमा (व्यासपूजन)

मायेच्या भवसागरातून शिष्याला आणि भक्ताला अलगदपणे बाहेर काढणारे, त्याच्याकडून आवश्यक ती साधना करवून घेणारे आणि कठीण समयी त्याला अत्यंत जवळिकीने अन् निरपेक्ष प्रेमाने आधार देऊन संकटमुक्त करणारे हे गुरुच असतात. अशा परमपूजनीय गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा. प्रस्तुत लेखात आपण गुरुपौर्णिमेचे महत्त्व तसेच हा उत्सव साजरा करण्याची पद्धत पहाणार आहोत.

**तिथी**

गुरुपौर्णिमा हा उत्सव सर्वत्र आषाढ पौर्णिमा या दिवशी साजरा केला जातो. (तामिळ प्रदेशात व्यासपूजा ज्येष्ट पौर्णिमेस साजरा करतात.)

**उद्देश**

गुरु म्हणजे ईश्वराचे सगुण रूप ! वर्षभर प्रत्येक गुरु आपल्या भक्तांना अध्यात्माचे बोधामृत भरभरून देत असतात. त्या गुरूंच्या प्रती अनन्य भावाने कृतज्ञता व्यक्त करणे, हा गुरुपौर्णिमा साजरा करण्यामागील उद्देश आहे.

**महत्त्व**

१. गुरुपौर्णिमा या शुभदिनी दिवशी गुरुतत्त्व (ईश्वरी तत्त्व) नेहमीच्या तुलनेत १ सहस्त्र (हजार) पटीने कार्यरत असते. त्यामुळे गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने केलेली सेवा आणि त्याग (सत्साठी अर्पण) यांचा इतर दिवसांच्या तुलनेत १ सहस्त्र पटीने लाभ होतो; म्हणून गुरुपौर्णिमा ही गुरुकृपेची (ईश्वरकृपेची) एक अनमोल पर्वणीच आहे.
२. गुरु-शिष्य परंपरा ही हिंदूंची लक्षावधी वर्षांची चैतन्यमय संस्कृती आहे; परंतु काळाच्या प्रवाहात रज-तमप्रधान संस्कृतीच्या प्रभावामुळे या महान अशा गुरु-शिष्य परंपरेची उपेक्षा होत आहे. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने गुरुपूजन होते, तसेच गुरु-शिष्य परंपरेची महती समाजाला सांगता येते. थोडक्यात गुरुपौर्णिमा म्हणजे गुरु-शिष्य परंपरेचे जतन करण्याची सुसंधीच होय !

गुरुपौर्णिमा साजरा करण्याची पद्धत

प्रत्येक गुरूंचे शिष्य या दिवशी त्यांच्या गुरूंची पाद्यपूजा करतात आणि त्यांना गुरुदक्षिणा मनोभावे अर्पण करतात. या दिवशी व्यासपूजा करण्याची प्रथा आहे. गुरुपरंपरेत महर्षि व्यास यांना सर्वश्रेष्ट गुरु मानले आहे. सर्व ज्ञानाचा उगम महर्षि व्यास यांच्यापासून होतो, अशी भारतियांची धारणा आहे. कुंभकोणम् आणि शृंगेरी ही शंकराचार्यांची दक्षिण भारतातील प्रसिद्ध पिठे आहेत. या ठिकाणी व्यासपूजेचा महोत्सव साजरा होतो. व्यासमहर्षी हे शंकराचार्यांच्या रूपाने पुन्हा अवतीर्ण झाले, अशी भाविकांची श्रद्धा आहे; म्हणून संन्यासी लोक या दिवशी व्यासपूजा म्हणून शंकराचार्यांची पूजा करतात.

१. गुरुपूजनाचा विधी

स्नानादी नित्यकर्मे आटोपून गुरुपरम्परासिद्ध्यर्थं व्यासपूजां करिष्ये । असा संकल्प करतात. एक धूतवस्त्र अंथरून त्यावर गंधाने पूर्वेकडून पश्चिमेकडे आणि उत्तरेकडून दक्षिणेकडे अशा बारा रेघा काढतात. ते म्हणजे महर्षि व्यास यांचे व्यासपीठ होय. मग ब्रह्मा, परात्परशक्ती, व्यास, शुकदेव, गौडपाद, गोविंदस्वामी आणि शंकराचार्य यांचे त्या व्यासपिठावर आवाहन करून त्यांची षोडशोपचारे पूजा करतात. याच दिवशी दीक्षागुरु आणि मातापिता यांचीही पूजा करण्याची प्रथा आहे.



गुरुपौर्णिमा म्हणजे परब्रह्मस्वरूप श्रीकृष्णाच्या आदिशक्तीची पूजा !

१. गुरुपौर्णिमा ही चैतन्याची गुरुपौर्णिमा असल्याने स्वत:तील चैतन्याला जागृत करून सेवा करा !

चैतन्यच सर्वत्र आहे आणि तेच गुरुस्वरूपातून कार्य करते. त्याचीच गुरुपौर्णिमा, त्याचेच कार्य आहे आणि तोच करणार आहे. आपण केवळ पहाणार आहोत. यासाठी ही चैतन्याची गुरुपौर्णिमा आहे, असे समजून आपल्यातील चैतन्याला जागृत करून सेवा करायची आहे.

२. आदिशक्तीचे स्वत:तील स्वरूप ओळखून तिचे स्तवन करा आणि तिला जागृत करा !

आपण स्वसंरक्षण प्रशिक्षणाच्या वेळी आदिशक्ती तू अंतशक्ती तू जगज्जननी तू लयकारी तू ।। हे शक्तीस्तवन म्हणतो. असे म्हटल्यावर प्रत्येकाने आपल्या अंत:स्थ आदिशक्तीला आवाहन करायचे असते. तिला जागृत करून कार्य करायचे असते; पण आपण बहिर्मुख होऊन ती शक्ती बाहेर शोधल्यास किंवा बाहेरील शक्तीत आदिशक्ती शोधण्याचा प्रयत्न केल्यास ती कार्यान्वित होत नाही.ही शक्ती माझ्यात आहे. ती जागृत होऊन कार्य करणार आहे, हे बिंबवण्यासाठी तिचे हे स्तवन आहे. हे समजून तिचे स्तवन करणे आणि ती वेगळी आहे, असे समजून तिचे स्तवन करणे यांत भेद आहे. आदिशक्तीला बाहेर पाहिल्याने दूरत्व येते, म्हणजे बाह्यत: पहाण्याचा प्रयत्न केल्याने ती दुसरी शक्ती असून ती जागृत होऊन तिने कार्य करावे, असे प्रतीत होते; परंतु वास्तविक येथे आपल्यातील शक्तीचे स्तवन करून तिला जागृत करून पेटून उठले पाहिजे.

३. गुरुपौर्णिमेला गुरूंच्या ठिकाणी असलेल्या आदिशक्तीचे स्मरण करून तिचे पूजन करा !

३ अ. परब्रह्मस्वरूप असलेल्या गुरुतत्त्वाचे महत्त्व !

गुरुब्रर्ह्मा गुरुर्विष्णु: गुरुर्देवो महेश्वुर: ।
गुरु: साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नम: ।।

अर्थ : गुरु हेच ब्रह्मा, गुरु हेच सर्वव्यापक भगवान विष्णु आणि गुरु हे शंकर आहेत. एवढेच नव्हे, तर ते साक्षात् परब्रह्म (ईश्वराचा ईश्वर) आहेत. अशा गुरूंना मी नमस्कार करतो.

ब्रह्मा, विष्णु आणि महेश ही आदिशक्तीचीच रूपे आहेत. परब्रह्मापासून निर्माण झालेले ब्रह्मा, विष्णु आणि महेश हे अंशरूपाने कार्य करतात, हे समजले पाहिजे. गुरुपौर्णिमा म्हणजे त्या परब्रह्मस्वरूप श्रीकृष्णाच्या आदिशक्तीची पौर्णिमा होय.

३ आ. गुरुपौर्णिमेच्या दिवशी केलेली गुरूंची पूजा ही जगद्गुरु श्रीकृष्णाचीच पूजा !

ईश्वर: परम: कृष्ण: सच्चिदानंद विग्रह: ।
अनादिरादिर्गोविन्द: सर्वकारणकारणम् ।।

**श्री ब्रह्मसंहिता, श्लोक १**

अर्थ : श्रीकृष्ण परम ईश्वर आहे. त्याचा श्रीविग्रह नित्य, चितघन आणि आनंदस्वरूप आहे. तो अनादि, सर्वश्रेष्ट आणि सर्व कारणांचा कारणस्वरूप गोविंद आहे.

गुरूंचे स्थान म्हणजे जो मूळस्वरूप आदि कृष्ण आहे, जो प्रलयानंतरही रहातो तो. अशा त्या जगद्गुरूंची शक्ती आहे, तिला नमन आहे. गुरुपौर्णिमेच्या दिवशी केलेली पूजा ही श्रीकृष्णाचीच पूजा आहे, असे समजूनच केली जाते. गुरु परब्रह्मस्वरूपी असल्याने आपण त्यांची पूजा परब्रह्मरूपी श्रीकृष्णाची पूजा म्हणून करतो.

३ इ. संत ज्ञानेश्वर महाराजांनीसुद्धा मूलस्वरूप अशा आदिशक्तीलाच प्रथम नमन करणे

संत ज्ञानेश्वंर महाराजांनीसुद्धा ज्ञानेश्वधरी लिहिताना मूलस्वरूप अशा आदिशक्तीलाच प्रथम नमन केले आहे. ते म्हणतात,

ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या । जयजय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।

ज्ञानेश्वूरी, अध्याय १, ओवी १

अर्थ : ॐ हे आदिशक्तीचे प्रथम स्वरूप असून ते वेदांनी प्रतिपादन केले आहे. तेच स्वसंवेद्य अशा आत्मस्वरूपाने सर्वत्र कार्य करत आहे, अशा ॐ काररूपी (श्रीकृष्णरूपी) आदिशक्तीला नमस्कार असो.

३ ई. गुरुपौर्णिमेला प.पू. भक्तराज महाराजरूपी गुरूंच्या चैतन्याची पूजा केली जाणे

सनातन संस्थेचे प्रेरणास्थान प.पू. भक्तराज महाराज श्रीकृष्णाचेच रूप आहेत. आपल्याला गुरुपौर्णिमेच्या वेळी त्यांच्यातील चैतन्यरूपी महान शक्तीची पूजा करायची आहे. येथे या शक्तीचे नाव प.पू. भक्तराज महाराज आहे. शेवटी ही गुरूंच्या चैतन्याची पूजा आहे. चैतन्याविना दुसरे काही नाही.

४. गुरुपौर्णिमा म्हणजे चैतन्यरूपी मूलतत्त्वाची पूजा असून मूळ स्वरूपाला विसरल्यामुळे अन् बहिर्मुख वृत्तीने कार्य केल्यामुळे विविध संप्रदाय, पंथ इत्यादींची निर्मिती होणे

गुरुपौर्णिमा म्हणजे चैतन्यरूपी मूलतत्त्वाची पूजा आहे; कारण तीच सर्वत्र सर्व जड-चेतन स्वरूपातून कार्य करत असून आपण तिला ओळखण्यासाठी तिच्या स्वरूपाप्रमाणे निरनिराळी नावे देतो. वास्तविक आदिशक्तीचे गुरुतत्त्व हे स्वरूप सर्वत्र एकच आहे. तिच्या मूळ स्वरूपाला विसरल्यामुळे आणि बहिर्मुख वृत्तीने बाह्य रूपाकडे पाहिल्यामुळे विविध संप्रदाय, पंथ इत्यादी बनले. त्यामुळे भेद निर्माण झाले. भेदामुळेच आज हिंदु धर्माची महान शक्ती लोप पावली आहे, विभागली गेली आहे. त्यामुळे धर्मशक्तीवर ग्लानी आली आहे. हा बाह्य संस्कार नाहीसा करून आणि त्या मूळ शक्तीला परत प्रगट करून एकसंघाने कार्य करण्याची आज नितांत आवश्यकता बनली आहे.

५. गुरु हे आदिशक्तीचे सगुण स्वरूप असून त्यांच्यात महान सामर्थ्य असल्याने ते शिष्याला ईश्वरत्व प्रदान करू शकणे

गुरु हे आदिशक्तीचे सगुण स्वरूप असून त्यांच्यात महान सामर्थ्य असल्याने ते शिष्याला ईश्व्रत्व प्रदान करू शकतात. आपल्या अंत:स्थ असलेल्या शक्तीला जागृत करण्याचे महान सामर्थ्य केवळ गुरुतत्त्वातच असते. त्या शक्तीला जागृत करण्यासाठी गुरुपौर्णिमेला तिचे पूजन करायचे आहे. यासाठीच सर्वत्र आदिशक्तीच कार्य करणारी आहे, हे समजून आपण गुरुपौर्णिमा साजरी करूया !